**विशेष दिवाणी दावा क्र. ९/२०२५**
अभिनंदन सुराणा –वि.–
संतोषकुमार सुराणा व इतर

**<u>अर्ज निशाणी क्र.५ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा दावा वादीने मौजे लोणार येथील नगर परिषद हद्दील क्षेत्र गट क्र.४७९ मधील वार्ड क्र.१ घर मालमत्ता क्र.६७३, वार्ड क्र.३ मधील मालमत्ता क्र.६२१ नझुल शिट क्र.११ मालमत्ता क्र.१६१, १६७ या वडीलोपार्जीत मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होउन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादीच्या विधीज्ञाने असा युक्तीवाद केला की, वर नमुद मिळकती वादी व प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचे वडीलोपार्जीत मिळकती असुन सदर मिळकतीत सर्वांचा सामाईक अविभक्त हिस्सा होता व आहे. पुढे न्यायालयाच्या असेही निदर्शनास आणुन दिले की, वाद मिळकतीपैकी गट क्र.४७९ ज्याचा नगर परिषद मालमत्ता क्र.६७३ असुन सदर मिळकत प्रतिवादी क्र.१ याने प्रतिवादी क्र.७ या बँकेकडे गहान ठेवुन वादीच्या संमतीशिवाय कर्ज उचललेले आहेत. पुढे न्यायालयाच्या असेही निदर्शनास आणुन दिले की, प्रतिवादी क्र.१ संतोषकुमार गेंदुलाल सुराना यांनी उचललेले कर्जाची परतफेड करीता जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडील आदेशान्वये तहसिलदार लोणार यांनी वर नमुद गट क्र.४७९ म्हणजेच मालमत्ता क्र.६७३ या मिळकतीची जप्ती करुन पुढील कारवाई करण्यासाठी तशी नोटीस प्रतिवादी क्र.१ व त्याचे जामीनदाराला काढलेली आहे. पुढे न्यायालयाच्या असेही निदर्शनास आणुन दिले की, सदर नोटीसच्या आधारे तहसिलदार लोणार हे वर नमुद मिळकत जप्त करण्याच्या तयारीत आहेत. वास्तविक पाहता सदर मिळकतीमध्ये वादीसह इतर हिस्सेदार राहण्यास आहेत. पुढे न्यायालयाच्या असेही निदर्शनास आणुन दिले की, वर नमुद गट क्र.४७९ मधील मिळकत जप्त झाल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे अपरीमित नुकसान होणार आहे. तरी प्रतिवादी हे हजर होईपावेतो तहसिलदार लोणार यांनी काढलेली नोटीसीस स्थगिती देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. वादीने त्याच्या कथनाच्या पुष्ट्यर्थ वाद मिळकतीचे उतारे, मालमत्ता पत्रक उतारा, लाईट बिल, फेरफार उतारा क्र.८३४१ व तहसिलदार लोणार यांनी प्रतिवादी क्र.१

संतोषकुमार सुराना व इतर यांना पाठवलेली नोटीसची प्रत दाखल केली आहे. वादीने वरीलप्रमाणे दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, मौजे लोणार येथील गट क्र.४७९ याचा नगरपरिषद मालमत्ता क्र.६७३ असुन ही मिळकत वादीची वडीलोपार्जीत मिळकत आहे. पुढे असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ संतोषकुमार सुराना याने वर नमुद गट क्र.४७९ मधील घर मिळकत प्रतिवादी क्र.७ बँकेकडे गहान खताद्वारे ठेवुन कर्जाची रक्कम उचललेली आहे आणि थकीत कर्जाची रक्कम वसुल करण्याकरीता जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्या आदेशान्वये तहसिलदार लोणार यांनी तशी नोटीस प्रतिवादी क्र.१ संतोषकुमार सुराना व इतर यांना पाठवलेली आहे. तहसिलदार लोणार यांनी पाठवलेल्या नोटीसातील मजकुरावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ संतोषकुमार सुराना यांच्याकडे थकीत कर्जाच्या रकमेपोटी गट क्र.४७९ मधील मिळकत जप्त/ताब्यात घेण्यात येणार आहे. तसे झाल्यास निश्चितच वादीचे कधीही न भरुन येणारे अपरीमित नुकसान होणार आहे. सबब, तहसिलदार लोणार यांनी वर नमुद नोटीसाप्रमाणे वाद मिळकत गट क्र.४७९ जप्त/ताबा घेण्याचा प्रयत्न करु नये असा एकतर्फा तुर्तातुर्त आदेश पारित करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार आहे. त्याअनुषंगाने मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र.८ जिल्हाधिकारी बुलढाणा व प्रतिवादी क्र.९ तहसिलदार लोणार यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी स्वतः किंवा त्यांच्या अधिकाऱ्यामार्फत वाद मिळकत गट क्र.४७९ ज्याचा नगर परिषद मालमत्ता क्र.६७३, ही मिळकत ते स्वतः हजर होउन त्यांचे लेखी म्हणणे दाखल करेपर्यंत पाठवलेल्या नोटीसच्या आधारे जप्त करु नये, असा तुर्तातुर्त मनाई आदेश देण्यात येत आहे.

२. वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ३ (अ) प्रमाणे पूर्तता करावी.

स्वा./-
**(अ.अ.शेख)**
दिनांकः २१/०२/२०२५ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मेहकर

## CERTIFICATE

| | |
|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order. | |
| Name of the Steno. Grade II | Balkrishna M. Shilwant. |
| Court | Civil Judge Senior Division, Mehkar. |
| Date | 21/02/2025 |
| Order signed by the presiding officer on | 21/02/2025 |
| Order uploaded on | 21/02/2025 |